महाराष्ट्र शासन

**ग्राम विकास विभाग**

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

टोल फ्री क्र. १८०० २२२ ०१९
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४
Email ID:-directoriayruralhousing@gmail.com
Website:- https://mahaawaas.com

जा.क्र./कावि/अतिक्रमण/तक्रार अर्ज/ ८९२/२०२३ दि: २८.०६.२०२३

प्रति,

प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अकोला.

विषय:- प्रधानमंत्री आवास (प्र.पत्र ब) घरकुल योजनेकरिता स्वमालकीची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २०.११.२०२२ रोजीचे आपले पत्र मिळाले त्यावरुन

संदर्भ:- प्रआयो-२०२३/प्र.क्र.०२/यो-१० दि. १२.०४.२०२३. श्री. कृष्ण अवधुत दाभाडे ता. अकोट जि. अकोला यांचे या कार्यालयास प्राप्त पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये श्री. कृष्ण अवधुत दाभाडे ता.अकोट जि. अकोला यांचे कार्यालयास केलेले, दि.२५.०४.२०२३ रोजीचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, ते सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. कृपया अवलोकन व्हावे.

त्या अनुषंगाने आपल्या स्तरावर चौकशी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अर्जदारास परस्पर कळविण्यात यावा व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

MTakale

(मंजिरी टकले)
उपसंचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

प्रत :- १) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना माहितीस्तव.
२) कक्ष अधिकारी (यो-१०), ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव.

जा.क्र./मंत्री ग्रा.वि.व पं.राज/वि.शि/क्री.व युवक कल्याण/जनरल/१२८७/२०२३

ग्रा.वि. व ज.स. वि. (ना.शा.)
कार्यासन क्र. ....ग्रा-१०....
दिनांक : ....२९/३/२३....
नस्ती क्र. ....२०२०....

उप सचिव (ग्रामविकास),
यांच्याकडून, उचित कार्यवाही करावी,
अशी मा. मंत्री महोदयांच्या निर्देशानुसार विनंती आहे.

(स्वीय सहायक)
मंत्री
ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण,
क्रीडा व युवक कल्याण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

योजना-१०,
०६/०३/२०२३

प्रति,

सचिव,
ग्रामपंचायत, बळेगाव,
ता. अकोट, जि. अकोला

अर्जदार :— श्रीकृष्ण अवधुत दाभाडे
रा. बळेगाव ता. अकोट जि. अकोला

**विषय :— प्रधानमंत्री आवास (प्र.पत्र ब) घरकुल योजनेकरिता स्वमालकीची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २०.११.२०२२ रोजीचे आपले पत्र मिळाले त्यावरुन.**

ग्रा-१०
४९१
११-०४-२०२३

महोदय,

वरील विषयाला अनुसरुन मी आपणाला विनंती करतो की, मी एक मातंक समाजाचा कायमस्वरुपी बळेगाव येथील रहिवासी आहे माझी आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असुन माझ्याकडे प्रधानमंत्री आवास घरकुल घेण्याकरिता नियमानुसार जागा उपलब्ध नाही परंतु बळेगाव ग्रामपंचायतच्या अखता—याखाली येणा—या गट क्र. ३८१ ही एफ क्लास जागा जवळपास २ एकरापर्यंत खाली आहे त्या एफ क्लास जागेमधील प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेकरिता मला आपण जागा उपलब्ध करुन दयावी गावातील व्यक्तीला पंतप्रधान आवास योजनेतुन घरकुल बांधण्याकरिता जागा उपलब्ध नसेल तर ती जागा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही सरपंच/ग्रामसेवक यांची आहे त्यामुळे मला सुटसुटीत व व्यवस्थितरित्या प्रधानमंत्री घरकुल बांधण्याकरिता जागा उपलब्ध करुन दयावी. मी आपणास सर्वोतोपरी लागणारे कागदपत्र देण्यास तयार आहे परंतु

राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - २४४-३
आवक दिनांक - २५-०४-२३
शाखा -
सहाय्यक संचालक (लेखा) उपसंचालक संचालक

आपण आपल्या दिनांक २०.११.२०२२ च्या पत्रामध्ये उल्लेखित केले आहे की, आपण २ दिवसात प्रस्ताव न दिल्यास आपले घरकुलाचे नाव कमी करण्यात येईल. त्यामुळे मी याठीकाणी नमुद करतो की, माझी हालाखीची आर्थिक परिस्थिती पाहुन घरकुलच्या यादीमधुन माझे नाव कमी करण्यात येवु नये व मला घरकुल बांधकामाकरिता बांधकाम स्तरावर जागा उपलब्ध करुन देण्यात यावी आणि ती जबाबदारी ग्रामपंचायतची आहे करिता हा अर्ज. आपण दिनांक २०.११.२०२२ चे दिनांक लिहिलेले पत्र मला आपण दिनांक २६.१२.२०२२ दिले हे येथे उल्लेखित आहे.

बळेगाव

दिनांक : २८.१२.२०२२

श्रीकृष्ण वक्ता भोडे

अर्जदार

प्रतिलिपी :

१. ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई
२. ग्रामविकास सचिव महाराष्ट्र राज्य मुंबई
३. जिल्हाधिकारी साहेब अकोला
४. मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. अकोला
५. गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोट.

प्रति
श्रीकृष्णा अवधूत दाभाडे
मु. पो. बळेगाव

विषय :- प्रधानमंत्री आवास (प्रपत्र 'ब') घरकुल योजनेकरिता स्वमालकीची जागा उपलब्ध करून देणे बाबत.

संदर्भ :- मा. मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. अकोला यांचे संभेतील सुचनेनुसार.
मा. गटविकास अधिकारी पं. स. अकोट यांचे सभेतिल सुचनेनुसार.

महोदय,

वरिल विषयानुसार आपणास सुचित करण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजनेकरिता आपले घरकुल मंजूर झाले आहे परंतु आपणाकडे घरकुल बांधकामा करिता 270 चौ. फूट जागा उपलब्ध नसल्यामुळे आपण घरकुलचे बांधकाम आपणाकडे उपलब्ध असलेल्या जागेमध्ये खाली व वर उक्त खोलीचे बांधकाम करू शकता त्याकरिता आपण ग्रा.प. कडे 100/- रु चे स्टॅम्प पेपरवर खाली व वर खाली बांधकाम करणेस तयार असल्याबाबतचा करार नामा व घरकुलचा प्रस्ताव दोन दिवसात ग्रा. प. कडे सादर करण्यात यावा.

प्रस्ताव सादर करणे बाबत आपणास यापूर्वीही वारंवार सुचना देण्यात आल्या ह्या अंतिम नोटीस द्वारे आपणास कळविण्यात येते आहे की आपण दोन दिवसात प्रस्ताव सादर नकेल्यास आपले घरकुलच्या यादीमधून नाव कमी करण्यात येईल. याला ग्रा. प. प्रशासन पं. स. प्रशासन जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. 20/11/2022

सरपंच
ग्राम पंचायत बळेगाव

सचिव
ग्राम पंचायत बळेगाव

प्रति,

सचिव,
ग्रामपंचायत, बळेगाव,
ता. अकोट, जि. अकोला

अर्जदार :— योगेश अवधुत दाभाडे
रा. बळेगाव ता. अकोट जि. अकोला

विषय :— **प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेकरिता स्वमालकीची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २०.११.२०२२ रोजीचे आपले पत्र मिळाले त्यावरुन.**

महोदय,

वरील विषयाला अनुसरुन मी आपणाला विनंती करतो की, मी एक मातंग समाजाचा कायमस्वरुपी बळेगाव येथील रहिवासी आहे माझी आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असुन माझ्याकडे प्रधानमंत्री आवास घरकुल घेण्याकरिता नियमानुसार जागा उपलब्ध नाही परंतु बळेगाव ग्रामपंचायतच्या अखत्या—याखाली येणा—या गट क्र. ३८१ ही एफ क्लास जागा जवळपास २ एकरापर्यंत खाली आहे त्या एफ क्लास जागेमधील प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेकरिता मला आपण जागा उपलब्ध करुन दयावी गावातील व्यक्तीला पंतप्रधान आवास योजनेतुन घरकुल बांधण्याकरिता जागा उपलब्ध नसेल तर ती जागा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही सरपंच / ग्रामसेवक यांची आहे त्यामुळे मला सुटसुटीत व व्यवस्थितरित्या राहण्यालायक घरकुल बांधण्याकरिता जागा उपलब्ध करुन दयावी. मी आपणास सर्वोतोपरी लागणारे कागदपत्र देण्यास तयार आहे परंतु

आपण आपल्या दिनांक २०.११.२०२२ च्या पत्रामध्ये उल्लेखित केले आहे की, आपण १५ दिवसात उपलब्ध करुन न दिल्यास, प्रस्ताव न दिल्यास आपले घरकुलाचे नाव कमी करण्यात येईल. त्यामुळे मी याठीकाणी नमुद करतो की, माझी हालाखीची आर्थिक परिस्थिती पाहुन घरकुलच्या यादीमधुन माझे नाव कमी करण्यात येवु नये व मला घरकुल बांधकामाकरिता बांधकाम स्तरावर जागा उपलब्ध करुन देण्यात यावी आणि ती जबाबदारी ग्रामपंचायतची आहे करिता हा अर्ज. आपण दिनांक २०.११.२०२२ चे दिनांक लिहिलेले पत्र मला आपण दिनांक २६.१२.२०२२ दिले हे येथे उल्लेखित आहे.

बळेगाव

दिनांक : २८.१२.२०२२

..........................
योगेश सामाते
अर्जदार

**प्रतिलिपी :**

१. ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई
२. ग्रामविकास सचिव महाराष्ट्र राज्य मुंबई
३. जिल्हाधिकारी साहेब अकोला
४. मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. अकोला
५. गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोट.

प्रती, श्रीकृष्ण अवधूत दाभाडे

श्री. ~~योगेश अवधूत दाभाडे~~

रा. देवरी ता. अकोट जि. अकोला

**विषय:- प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेकरीता स्वमालकीची जागा उपलब्ध करून देण्याबाबत..**

**संदर्भ:- मा. मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. अकोला यांच्या सभेतील सूचनेनुसार,**

**मा. गटविकास अधिकारी पं. स. अकोट दिनांक ------------ च्या सभेतील सूचनेनुसार,**

मा. महोदय,

वरील विषयानुसार आपणास सुचित करण्यात येते की प्रधानमंत्री आवास योजनेकरीता आपले घरकुल मंजूर झाले आहे. परंतु स्वमालकीची जागा आपलेकडे उपलब्ध नसल्यामुळं / नमूना ८ नसल्यामुळे घरकुल प्रलंबित आहे. त्यामुळे या बाबत आपल्याला वारंवार सूचना देऊन ही आपण आवश्यक कागदपत्रे ग्रा. पं . कडे सादर केलेली नाही. यामुळे पात्र यादीतुन आपले नाव वगळण्यात येऊन आपल्याला अपात्र करण्यात येईल: यामुळे आपल्याला भविष्यात घरकुल योजनेचा लाभ मिळणार नाही. या सर्व बाबीसाठी आपण व्यक्तिशा जबाबदार राहाल हया अंतिम नोटिस दद्वारे आपल्याला जाणीव करून देण्यात येत आहे की, आपण १५ दिवसाच्या आत स्वमालकीची जागा उपलब्ध करुन याबाबतचे आवश्यक कागद पत्रे ग्रामपंचायत कडे सादर करून ग्रामपंचायत सहकार्य करावे व आपणही घरकुलाचा लाभ घेऊन घरकुलापासून वंचित राहु नये, अन्यथा आपले नाव शासन स्तरावरून यादीमधून वगळल्यास याला ग्रा. प. प्रशासन / प. स. प्रशासन जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

20/11/2022

सरपंच
ग्राम पंचायत बळेगाव

सरपंच / सचिव
ग्राम पंचायत, बळेगाव
ग्राम पंचायत देवरी

आज़ादी का
अमृत महोत्सव




To

ग्रामविकास मंत्री
महाराष्ट्र राज्य मुंबई
मुंबई

पिन PIN

(इस लाइन के नीचे न तो लिखें और न ही मुद्रित करें Do not write or print below this line)

S.P.P. HYD 2022